<u>केंद्र पुरस्कृत योजना सन २०१८-१९</u>
"व्याघ्र प्रकल्प" योजनांतर्गत नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाकरीता निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०९.१८/प्र. क्र. ३४४(भाग-१)/फ-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक :- १९ मार्च, २०१९.

<u>वाचा :-</u>

१. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८.
२. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक ४-१(४४)/२०१८-पीटी, दिनांक २७.०८.२०१८.
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०९.१८/प्र.क्र.३४४/फ-१, दिनांक १९.०९.२०१८.
४. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक ४-१(४४)/२०१८-पीटी, दिनांक २५.०२.२०१९.
५. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८.०३.२०१९.
६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य पत्र क्र.कक्ष-१/सी/यो/प्र.क्र.१२/NNTR/२२७०/१८-१९, दिनांक ०८.०३.२०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

"व्याघ्र प्रकल्प" योजनांतर्गत पूर्वी केंद्र शासनाकडून अनावर्ती बाबींकरीता २४०६ १२४३ या लेखाशिर्षातंर्गत १००% केंद्र अनुदान उपलब्ध करुन दिले जात होते. तथापि सन २०१६-१७ मध्ये सदर योजनेच्या हिस्सा पध्दतीमध्ये बदल करण्यात आल्याचे केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रायल, नवी दिल्ली यांनी सूचविले. त्या नुसार सन २०१६-१७ मध्ये व्याघ्र प्रकल्प या योजनेकरीता केंद्र हिस्सा ६०% अंतर्गत २४०६ १२४३ हे लेखाशिर्ष तर त्याच अनुरुप राज्य हिस्सा ४०% अंतर्गत २४०६ A१०२ या लेखाशिर्षाचा व आवर्ती बाबींकरीता केंद्र हिस्सा ५०% अंतर्गत २४०६ ए१२२ हे लेखाशिर्ष तर त्याच अनुरुप राज्य हिस्सा ५०% अंतर्गत २४०६ A१३१ या लेखाशिर्षाचा वापर करण्यात येत आहे

२. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत योजना-व्याघ्र प्रकल्प अंतर्गत नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाकरीता केंद्र शासनाने संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये रु. १३४१.२५ लक्षचे कार्यबाबींस केंद्र शासनाने मंजूरी प्रदान केलेली आहे. संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाकरीता रु. १००१.९७२ लक्षा निधी वितरीत करण्यात आला आहे. केंद्र शासनाने सुधारीत केंद्र हिस्सा पध्दतीनुसार नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाकरिता सन २०१८-

१९ मध्ये केंद्र हिस्स्याअंतर्गत आवर्ती व अनावर्तीबाबींकरीता दुसरा हप्ता **रु. १५०.४७ लक्ष निधी** मंजूर केला आहे. त्या अनुषंगाने राज्य हिस्स्याअंतर्गत अनावर्ती + आवर्ती बाबींसाठी राज्य शासनास **रु. ११७.७७८ लक्ष असे एकूण रु**. **२६८.२४८लक्ष** निधी मुक्त करणे अपेक्षित होते.

<u>शासन निर्णय</u>

सदर शासन निर्णयान्वये वर नमूद केल्याप्रमाणे **रु. २६८.२४८ लक्ष निधी** सोबत जोडलेल्या विवरण पत्रानुसार संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या कार्यबाबींवर खर्च करण्यास खालील अटींच्या अधिन राहून शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ) सदर शासन निर्णयान्वये विरतीत केलेला निधी केंद्र शासनाने संदर्भीय पत्रान्वये मान्यता दिलेल्या तपशीलवार कार्यबाबींवर व सदर कामांना सक्षम प्राधिका-याची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता असल्याखेरीज रक्कम खर्ची टाकण्यात येऊ नये.

आ) वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच केंद्र शासनाने प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

इ) प्रस्तावित असलेल्या मोठया बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची संबंधीत नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील.

ई) वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

उ) प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासनाचा हिस्सा व राज्य शासनाचा हिस्सा मधील अंतर्भूत १० % Flexi Fund **बाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी**.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८.०३.२०१९ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१९१६४९०८०३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2019.03.19 16:50:43 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, नागपूर.
५. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया.
६. महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
७. फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).

****

शासन निर्णय क्रमांकः डब्ल्यूएलपी-०९.१८/प्र.क्र.३४४ (भाग-१)/फ-१, दिनांक :- १९ मार्च,२०१९. सोबतचे विवरणपत्र :-

(रक्कम रु. लाखात)

लेखाशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीव	केंद्र शासनाकडून मंजूर	सन २०१७-१८ मधील अखर्चीत रक्कम	शासन निर्णय दिनांक १९.०९.२०१८ अन्वये वितरीत निधी	सदर शासन निर्णयान्वये वितरीत निधी
१	२	३	४	५
अनावर्ती (६०टक्के) (२४०६ १२४३)	४९०.३७	७१.०२	३२१.२७६	९८.०७४
आवर्ती (५०टक्के) (२४०६ए १२२)	२६१.९८	०	२०९.५८४	५२.३९६
एकूण केंद्र हिस्सा	७५२.३५	७१.०२	५३०.८६	१५०.४७
अनावर्ती (४०टक्के) (२४०६ए १०२)	३२६.९१	०	२६१.५२८	६५.३८२
आवर्ती (५०टक्के)(२४०६ ए १३१)	२६१.९८	०	२०९.५८४	५२.३९६
एकूण राज्य हिस्सा	५८८.९	०	४७१.११२	११७.७७८
एकंदर	**१३४१.२५**	**७१.०२**	**१००१.९७२**	**२६८.२४८**

****